International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.4 March – April 2024

# साथीच्या रोगानंतर पर्यटन प्रवासावर झालेल्या परिणामांचा समाजशास्त्रीय अभ्यास

**श्री. दत्तात्रय हरी नाईक**
*सहा. प्राध्यापक समाजशास्त्र विभाग*
*श्रीपतराव चौगुले आर्ट्स अँड सायन्स कॉलेज, माळवाडी- कोतोली.*
*Corresponding Author - श्री. दत्तात्रय हरी नाईक*
DOI - 10.5281/zenodo.10953410

**प्रस्तावना:**

आदिमानव हा भटकंती करणारा असल्यामुळे एका ठिकाणी तो स्थिर नव्हता पण तो निरोगी जीवन जगत होता. याउलट ज्यावेळी शेतीचा शोध लागला आणि मानवाचे जीवन स्थिर बनले. पण शेतीसाठी आवश्यक पाणी साठा तो ठेवू लागला, साठलेल्या पाण्यामध्ये ढासांची पैदास वाढू लागली. त्यामुळे डेंग्यू सारख्या रोगांचा प्रसार होऊ लागला. स्थिर शेती करत असल्याने त्याने अनेक पाळीव प्राणी आपल्या सोबत बाळगायला सुरुवात केली. साथीचे रोग शक्यतो त्या भागातील दूषित पाण्यामुळे होतात, डासांमुळे, कुत्र्यांमुळे, म्हैस, बैल, घोडा आणि उंदरांमुळे पसरतात,आजार झालेला रुग्ण दुसऱ्या व्यक्तीच्या संपर्कात आल्यास त्या दुसरी व्यक्तीला आणि तिच्याकडून इतरांना आजार धोका निर्माण होतो. अशाप्रकारे आजाराचे रुग्ण वाढत जातात. तसेच, मानव हा शाकाहारी शरीर रचनेचा प्राणी असून देखील मांसाहार करू लागला. पर्यायाने शेळी, मेंढी या सारख्या प्राण्यांच्या मांसातुन विषाणूंचा शरीरात प्रवेश होत राहिला. परिणामी माणूस स्वतःहून जीवन पद्धत आणि चुकीचा आहार यामुळे रोगराईला निमंत्रण देत राहिला. तसेच “वाढती लोकसंख्या, वन्यजीवांभोवती, झालेलं माणसांचं अतिक्रमण आणि पर्यावरणात हस्तक्षेप यामुळे रोगाच्या साथी पसरत आहेत” असे आरोग्य तज्ञांचे मत आहे. तसेच जागतिक तापमान वाढीमुळे डासांसारखे रोगप्रसार करणाऱ्या कीटकांची पैदास वाढण्यास मदत होते. सध्याचे संशोधन शाश्वत पर्यटनाच्या दिशेने साथीच्या आजारानंतरच्या पर्यटन प्रेमींच्या वृत्तीवर परिणाम करणाऱ्या भावनिक, पर्यावरणीय, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक घटकांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न करते. मानव हा असा प्राणी आहे की, जो प्रत्येक गोष्टीतून आनंद, सुख आणि समाधान प्राप्त करण्याचा प्रयत्न करत असतो. त्यासाठी तो अनेक प्रकारचे छंद जोपासत असतो. उदाहरणार्थ: चित्र काढणे, गीत गाणे, पोहणे, व्यायाम करणे, निसर्गाच्या सानिध्यात जाणे, वेगवेगळ्या ठिकाणी फिरायला जाणे यासारख्या

अनेक विविध गोष्टींचा छंद असतो. पर्यटन सफर हा यातीलच एक महत्त्वाचा छंद म्हणून ओळखला जातो.पर्यावरणाविषयी असलेले प्रेम,आकर्षण आणि निसर्गरम्य अशा दुर्गम ठिकाणी जाण्याचा छंद यामुळे पर्यटन करण्याची इच्छा निर्माण होते. पण मानवी जीवन सुरळीत चालू असताना अचानक साथीचा रोग ज्यावेळी थैमान घालतो त्यावेळी मानव समाजापासून आणि त्याच्या छंदापासून दूर जातो. त्यामुळे समाजातील व्यक्तींचे जागरूक मन, समजलेला धोका, समजलेले ज्ञान इत्यादी घटकांमधील संबंध तपासणे गरजेचे आहे. कारण, कोविड-19 ची भयावह परिस्थिती आणि त्यामुळे निर्माण झालेली प्रवासाची भीती आणि प्रवासाची चिंता यासारखे भावनिक घटक तपासणे हे सध्याच्या संशोधनाचे उद्दिष्ट आहे.साथीच्या रोगावर उपचार केल्यानंतर पर्यटनाचा आस्वाद घेणे शक्य असते.त्यासाठी वेगवेगळी निसर्गरम्य ठिकाणे, प्रसन्न वातावरण आणि सुरक्षितता लक्षात घेणं महत्त्वाचं आहे. हे सदरच्या पेपरच्या माध्यमातून अभ्यासायचे आहे.

**व्याख्या-**

"एकाच गावात राहणाऱ्या बऱ्याच लोकांना जेव्हा एकच आजार होतो, तेव्हा त्या आजाराला 'साथीचा आजार' असे म्हणतात."

"एका व्यक्तीने किंवा व्यक्ती समूहाने एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी मनोरंजनासाठी, अभ्यासासाठी, कामासाठी केलेला प्रवास म्हणजे 'पर्यटन' होय."

"कोरोनाव्हायरस रोग हा विषाणूमुळे होणारा आजार आहे.ज्याला COVID-19 या नावाने देखील ओळखतात."

**उद्दिष्टे:**

१) कोविड-19 नंतर प्रवासावर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.

२) साथीच्या रोगाचा उद्रेक झाल्यानंतर प्रवासाला प्रोत्साहन देणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे.

३) पर्यटन सफर करणाऱ्या कंपन्यांच्या शाश्वत विकासातील योगदान व धोरणांचा अभ्यास करणे.

**गृहीतकृत्ये**:

साथीच्या रोगांचा पर्यटकांच्या भावनिकतेवर परिणाम होतो.

**भारतातील पर्यटन स्थळे:**

भारताच्या सहलीसाठी भारताचे हिल स्टेशन्सपासून ते समुद्रकिनारे ते अध्यात्मिक ठिकाणापर्यंत विविध स्थळांची भूमी आहे.वैविध्यपूर्ण संस्कृती आणि समृद्ध इतिहास असलेला भारत दरवर्षी लाखो पर्यटकांना आकर्षित करतो. देशांतर्गत पर्यटकांनी सर्वाधिक भेट दिलेले राज्य तामिळनाडू हे आहे, तर विदेशी पर्यटकांच्या यादीत महाराष्ट्र अव्वल आहे.

**कोविड-19 नंतर प्रवासावर झालेला परिणाम:**

१९७७ मध्ये देवी या रोगाचे संपूर्ण निराकरण झाल्याचे जागतिक आरोग्य संघटनेने जाहीर केले होते. असे असले तरी भारतात धनुर्वात, नारू, मलेरिया, पटकी (कॉलरा), पोलिओ यासारखे साथीचे रोग मोठे नुकसान करून गेलेले दिसतात. रुग्णांच्या लाळ, विष्ठा-शिंकेमार्फत पोलिओचे विषाणू हवा-अन्न-पाण्यातून सर्वत्र पसरतात. त्यामुळे २००९ मध्ये स्वाइन फ्लू, आणि २०१९ मध्ये कोविड-19 च्या बाबतीत, लोकांमध्ये विषाणूची तीव्रता आणि संसर्गाची भीती होती. पुढे सोशल मीडियावरील साथीच्या रोगाविषयी दिशाभूल करणारी माहिती आणि संशयास्पद प्रवासाची समज या सर्वांमुळे प्रवासाची मागणी कमी होताना दिसते.मानवनिर्मित आणि नैसर्गिक आपत्तीमुळे सदरील कंपन्यांचे आर्थिक नुकसान होतेच, शिवाय शाश्वत विकासात अडथळा निर्माण होत असताना दिसतो. त्यामुळे पर्यटकांचे प्रमाण कमीजास्त झाल्याचे आढळून येते.पर्यायाने "COVID-19 नंतरच्या महामारीमुळे ग्राहकांचा पर्यटनाबद्दल विचार करण्याची पद्धत बदलली आहे. ४८% लोकांना असे वाटले की, साथीच्या रोगाने त्यांना पर्यावरणाबद्दल अधिक जागरूक केले आहे. ४०% लोकांना असे वाटले की,शाश्वत प्रवासाच्या निवडी करण्यासाठी पूर्वीपेक्षा अधिक आपण 'दृढनिश्चयी' बनलेले आहेत.असे असले तरी मानव संघर्ष करण्यास नेहमी तत्पर असतो आणि आपला सुखाचा मार्ग शोधत असतो. त्यामुळे पर्यटनाच्या माध्यमातून स्वतःसाठी आणि आपल्या कुटुंबासाठी तो बाहेर पडतो. कारण, पर्यावरणाच्या संपर्कात गेल्यास आणि कुटुंबातील सदस्यांची साथ मिळाल्यास त्याला कोणती कोणत्याही संकटाची भीती वाटत नाही.

**प्रवासाला प्रोत्साहन:**

शाश्वत परिस्थिती सुरळीत करण्यासाठी 'लॉकडाऊनचा' वापर करून पर्यटनाचा पुनर्विचार करण्यासाठी न्यूझीलंड हे एक उत्तम उदाहरण आहे. नवीन सायकल मार्ग तयार केले.पर्यटनामुळे परकीय चलन निर्माण होते, प्रादेशिक विकासाला चालना मिळते. तसेच, विविध प्रकारच्या नोकऱ्या - उद्योगांना थेट सहाय्य मिळते आणि अनेक स्थानिक समुदायांचा पाया असल्याचे दिसून येते. भारतात देखील अशी अनेक पर्यटन स्थळे आहेत ही जी देशाच्या स्वायत्त विकासात भर टाकण्याचा प्रयत्न करतात. राष्ट्रीय GDP मध्ये ६.२३% आणि भारतातील एकूण रोजगारामध्ये ८.७८ % योगदान देते. अशा प्रकारची सकारात्मक उदाहरणे पर्यटकांसमोर आणून त्यांच्यामध्ये सकारात्मक भाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो.तसेच, पर्यटन किंवा यात्रा याबद्दल लोकांमध्ये जनजागृती करण्यासाठी जाहिरातींचा वापर आणि वेगवेगळ्या सवलती व बक्षीसे देण्याचे पर्यटन कंपन्यांनी धोरण ठरवले.अनेक पर्यटन विकास संस्थांनी पर्यटनाच्या वाढत्या प्रभावामुळे होणारे नकारात्मक परिणाम कमी करण्यासाठी शाश्वत पर्यटनावर लक्ष केंद्रित करण्यास सुरुवात केली आहे. युनायटेड नेशन्स वर्ल्ड टूरिझम ऑर्गनायझेशनने २०२७ मध्ये

विकासासाठी शाश्वत पर्यटनासाठी आंतरराष्ट्रीय वर्ष पर्यटन वर्ष जाहीर केले. पर्यटन विकासावर लक्ष केंद्रित करण्यासाठी SDG शाश्वत अर्थव्यवस्था निर्माण करण्यात पर्यटनाचा समावेश करतात . विविध कार्यक्रमांद्वारे शाश्वत विकास उद्दिष्टांचा भाग म्हणून पर्यटनाला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करण्यात आलेला दिसून येतो.पर्यटन सफर घडवून आणणाऱ्या कंपनीतील विशेषतज्ञ प्रभावी संवाद आणि मार्गदर्शक तत्त्वे तयार करतील. ज्यामुळे जागरूक प्रवासाला प्रोत्साहन मिळेल. 'प्रवासाची भीती आणि चिंता' दूर होईल, अशा प्रकारची रणनीती आखावी. जेणेकरून केलेला प्रवास आनंददायी बनेल.

**राष्ट्राच्या आर्थिक शाश्वत विकासात पर्यटन कंपनींचा सहभाग**:

पर्यटन हे विविध सांस्कृतिक, प्राकृतिक, ऐतिहासिक आणि लोकप्रिय ठिकाणे पाहण्यासाठी केले जाते.इ.स.पूर्व १९ व्या शतकात यात्रा किंवा पर्यटनाकडे व्यावसायिक क्षेत्र पाहिले जाऊ लागले. पर्यटन विकसित वा उद्योग असल्यामुळे ते स्थानीय आर्थिक वाढीसाठी उपयुक्त मानले गेले. यामुळे स्थानीय समुदायांना जीवनस्तर उत्तम बनवण्यास, सांस्कृतिक वाढ करण्यास आणि रोजगाराची स्थापना करण्यात मदत करतो.पूर्वीपासून ते आत्तापर्यंत मानवी समाजाने अनेक साथीच्या रोगांचा सामना केलेला आढळून येतो. वेगवेगळ्या साथीच्या रोगांमुळे मानवाची फार मोठ्या प्रमाणात जीवित व वित्त हानी झालेली दिसून येते. मानव दैनंदिन जीवनातून स्वतःसाठी व कुटुंबासाठी वेळ देण्यासाठी पर्यटनाची निवड करतो,यातून शाश्वत विकास घडत असतो.तसेच,पर्यटन सफर घडवणाऱ्या अनेक कंपन्यांना सुद्धा पर्यटन हा आर्थिक उत्पन्नाचा मार्ग असतो.

पर्यटनातून उत्पन्न आणि रोजगार निर्मिती होत असते.भारतातील पर्यटन हे उत्पन्न आणि रोजगार निर्मिती, दारिद्र्य निर्मूलन आणि शाश्वत मानवी विकासाची साधन म्हणून उदयास आलेले दिसून येते. ते राष्ट्रीय GDP मध्ये ६.२३% आणि भारतातील एकूण रोजगारामध्ये ८.७८ % योगदान देते.

**निष्कर्ष :**

1. साथीच्या रोगा नंतर डॉक्टरांच्या सल्ल्याने आणि योग्य उपचार पद्धती जाणून पर्यटन आनंददायी बनवू शकतो हे लक्षात येते.
2. ग्राहक प्रेरणा, असंतोष, नैतिक भूमिका, ग्राहक गोंधळ,आर्थिक आणि सांस्कृतिक घटक पर्यटनावर परिणाम करू शकतात.
3. भारतातील पर्यटन हे उत्पन्न आणि रोजगार निर्मिती, दारिद्र्य निर्मूलन आणि शाश्वत मानवी विकासाची साधन म्हणून उदयास आलेले दिसून येते.

**संदर्भ:**

1. डॉ. साळुंखे सर्जेराव (२०१०) समाजशास्त्रातील मूलभूत संकल्पना, प्रोफेशन पब्लिशिंग हाऊस, पुणे

2. गोडबोले अच्युत, कहाते अतुल, देशपांडे अमृता (जाने.२०२३) “वैद्यकायन” मधुश्री पब्लिकेशन.
3. https://www.ifrc.org › what-disaster
4. महामारी आणि साथीचे रोग
5. https://marathi.webdunia.com › ess...
6. Tourism पर्यटन आणि त्याचे महत्त्व मराठी निबंध
7. वर्तमानपत्र व मासिके